सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२४–२५/९७७ **महत्त्वाचे** दिनांक : १३/०१/२०२५.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
**विद्यार्थी विकास मंडळाच्या योजना राबविणारी**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना नियमावली, अटी व मार्गदर्शक तत्वांच्या काटेकोर अंमलबजावणीबाबत.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था आणि विद्यापीठ परिसरात कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत सहाय्यभूत ठरणारी आणि स्वावलंबनासाठी महत्त्वाकांक्षी योजना राबविली जाते. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ही योजना शिक्षण घेणाऱ्या गरीब व श्रम प्रतिष्ठा जपू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेची नियमावली, मार्गदर्शक तत्वे (Guidline) व अटी या विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्या आहेत. त्यानुसारच सदर योजनेकरिताची पात्रता, विद्यार्थ्यांचा प्रवेश, योजने अंतर्गत करावयाची कामे, कामाचे तास, मानधन अदा करण्याची पध्दत या योजनेच्या नियमावली व मार्गदर्शक तत्वांच्या अधिन राहूनच सदर योजना महाविद्यालय/परिसंस्थेत राबविण्याची अनुमती देण्यात येते. परंतु काही महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेची अंमलबजावणी करताना योजनेच्या नियमावली, अटी व मार्गदर्शक तत्वाचा पूर्णपणे अवलंब केला जात नसल्याचे समजते.

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविणाऱ्या सर्व संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांना कळविण्यात येते की, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या नियमावली, अटी व मार्गदर्शक तत्वांनुसार सदर योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जावी.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी योजनेच्या प्रचलित सर्व नियम, अटींचे व मार्गदर्शक तत्वांचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय व आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जवाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणाच्या नियमावलीत न राहता उपक्रमासंबंधी झालेल्या कार्यवाहीचा व वार्षिक लेख्यांचा वार्षिक लेखा परीक्षणाच्यावेळी विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. कळावे, ही विनंती.

**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन संपर्क :**
020-25622680/25622681

**(डॉ. अभिजीत कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ